15 JUL 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भिंती अन् खिडक्यावरही बसणार नॅनो सोलर सिस्टिम

## शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, संशोधक डॉ. पी. एस. पाटील यांचे वैशिष्ट्यपूर्ण संशोधन

**शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि जागतिक किर्तीचे संशोधक डॉ. पी. एस. पाटील यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर फोटोकॅटॅलिसिस आणि सौरघट संशोधनात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या तीन दशकांपासून संशोधनात सातत्य ठेवल्याने जागतिक स्तरावर फोटोकॅटलिसीस आणि सौरघट संशोधनात जगात १२९ क्रमांकावर तर देशातील दुसऱ्या क्रमांकाचे संशोधक म्हणून त्यांची नोंद झाली आहे. सिलिकॉन सोलर सिस्टम चांगली आहेच, पण नॅनो सोलर सिस्टिम ही घराच्या भिंती आणि काचेच्या खिडकीवरही बसवता येणार आहे, अशी माहिती डॉ. पी. एस. पाटील यांनी तरुण भारत'शी बोलताना सांगितली. त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण संशोधनासंबंधी त्यांच्याशी साधलेला हा संवाद..**

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

**प्रश्न: विद्यार्थी ते संशोधक हा तुमचा प्रवास कसा होता?**

**उत्तर:** चंदगड तालुक्यातील दुंडगे गावात जन्म झाला असला तरी प्राथमिक व माध्यमिकचे शिक्षण संपल्यानंतर उच्च शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात आलो. येथेच पीएचडी पूर्ण करून सहाय्यक प्राध्यापक म्हणून १९९० साली रुजू झालो. संशोधनासाठी लागणारी प्रयोगशाळा, पूरक साधन-सामुग्री उभारण्याचे आव्हान होते मात्र विद्यापीठाने पूर्ण सहकार्य केले. सुरुवातीच्या काळात माझे काही संशोधन प्रकल्प डावलण्यात आले. मात्र खचून न जाता प्रकल्पांमधील त्रुटींची पूर्तता करीत पुन्हा प्रकल्प केंद्र सरकारच्या शिखर संस्थेला पाठवले. आयआयटीसारखी संस्था स्पर्धेत असताना आपल्या प्रकल्पाला मान्यता मिळाली. येथूनच यशाचा आलेख उंचावत गेला. जर्मनीतील डाटा एक्स्चेंज ॲकॅडमीत दोन वर्षे संशोधन केले. ज्येष्ठ संशोधक मायकल यांनी सोलर संशोधनातील बारकावे शिकवले. हा अनुभव गाठीशी घेत १९९९ मध्ये संशोधनात टीमवर्क सुरू केले.



**प्रश्न: आपल्या या संशोधनाचा समाजासाठी काय उपयोग होणार?**

**उत्तर:** भारतात मुबलक सूर्यप्रकाश असल्याने सोलर एनर्जीचा जास्तीत जास्त फायदा होतो. सिलिकॉन सोलर फक्त छतावर बसवता येतो. परंतु नॅनो सोलर इमारतीच्या भिंतीत, खिडकीवर बसवता येतो. तसेच कोयनेतून होणाऱ्या वीजपुरवठ्याचा खर्च सोलरमुळे कमी होणार आहे. आता आम्ही कमी खर्चात दर्जेदार सोलर देणार आहोत. फोटोकॅटॅलिसिसच्या माध्यमातून हवा, पाणी प्रदूषण कमी करता येते.

**प्रश्न: तुम्ही संशोधनात विद्यार्थी, प्राध्यापकांना कसे सामावून घेतले?**

**उत्तर :** दर्जेदार संशोधनात टीमवर्कला अतिशय महत्त्व आहे. मलाही अनेक संशोधकांनी मदत केल्यानेच मी यशस्वी झालो. हे लक्षात ठेवून जास्तीत जास्त संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांना बरोबर घेऊन सोलर सिस्टिममध्ये संशोधन केले.

**प्रश्न: पेटंट मिळवण्यासाठी काय प्रयत्न सुरू आहेत?**

**उत्तर :** संशोधन क्षेत्रात पेटंटला महत्त्व आहे यात शंका नाही. विद्यापीठ पेटंट मिळवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. परंतु सध्या स्थानिक औद्योगिक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात टेक्नॉलॉजी सप्लाय करण्याचे काम सुरू आहे.

**प्रश्न: नॅनो सायन्स विभागाची स्थापना कशी केली?**

**उत्तर :** शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य सरकारने विद्यापीठाला ५० कोटींचा निधी जाहीर केला. या निधीमध्ये काय करायचे यासंदर्भात चर्चा झाली. तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्यासमोर नॅनो सायन्स अभ्यासक्रमाचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यांनी त्यास त्वरित मान्यता दिली. १० कोटी रूपयात नॅनो सायन्स विभागाची इमारत, अभ्यासक्रम व पूरक प्रयोगशाळेची निर्मिती केली.

**प्रश्न: संशोधनासारखा क्लिष्ट विषय तुम्ही सोप्या भाषेत कसा मांडला?**

दर्जेदार संशोधनासाठी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असण्याची गरज आहे. कारण सोलर सिस्टिममध्ये जगभरातील हजारो संशोधक काम करीत असतात. साध्या भाषेत संशोधन पेपर सादर केला तर संशोधन पेपरचे व्हूज वाढून किती संशोधकांनी तुमचा संशोधन पेपर संदर्भ म्हणून आपल्या संशोधनात वापरला त्यावर तुमच्या संशोधनाचा दर्जा वाढत असतो. त्यामुळे मी संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधकांना कळेल अशा सोप्या भाषेत दर्जेदार संशोधन पेपर लिहिले आहेत. त्यामुळेच ३७०८ संशोधकांचे व्हूज मिळाले आहेत. तसेच वर्ल्ड सायंटिस्ट ॲंड युनिव्हर्सिटी रँकिंगमधील १२९ संशोधकांच्या यादीत समावेश झाला आहे.

15 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आय विटनेस

# विद्येबरोबरच 'सौंदर्य'पीठ



कोल्हापूर जिल्ह्यात सध्या जोरदार पाऊस कोसळत आहे. या पावसात मुळातच देखणी असलेली शिवाजी विद्यापीठाची इमारत न्हाऊन निघाली आहे. त्यामुळे तिचे सौंदर्य अधिकच खुलले आहे. विद्यापीठाच्या समोरच साठलेल्या पाण्यात या इमारतीचे प्रतिबिंब उजळून निघत आहे. (छाया : आदित्य वेल्हाळ)

15 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उच्च शिक्षण सहसंचालकपदी कठरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकपदी प्रा. डॉ. हेमंत नाना तथा एच. एन. कठरे यांची, तर प्रा. डॉ. सोनाली रोडे यांची मुंबई विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकपदी बुधवारी उच्च शिक्षण विभागाने नियुक्ती केली. प्रा. कठरे हे राजाराम महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाचे सहयोगी प्राध्यापकपदी आणि प्रा. रोडे या प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटरच्या प्रभारी संचालकपदी कार्यरत आहेत. प्रा. कठरे यांच्याकडे सहसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

कोल्हापूर विभागीय सहसंचालकपदी सध्या कार्यरत असणाऱ्या डॉ. अशोक उबाळे यांची



एच एन कठरे सोनाली रोडे

> कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी मिळाल्याचा आनंद आहे. शासन नियमानुसार या पदावर कार्यरत राहणार आहे.
>
> -प्रा. डॉ. एच. एन. कठरे.

अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेत मूळ ठिकाणी बदली झाली आहे. प्रा. कठरे यांचे मूळ गाव पाचवड (ता. खटाव, जि. सातारा) असून गेल्या १५ वर्षांपासून ते राजाराम महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी नागपूरमध्ये काम केले आहे. प्रा. रोडे या मूळच्या अमरावती येथील आहेत. शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेमधून सहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांची शिक्षण क्षेत्रातील कारकीर्द सुरू झाली. सन २०१६ मध्ये राजाराम महाविद्यालयात त्या रूजू झाल्या. दरम्यान, कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदावरील नियुक्तीसाठी मुंबईतील सिडनेहॅम कॉलेजमध्ये उच्च शिक्षण विभागाकडून पात्र २५ उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया जूनच्या अखेरच्या आठवड्यात पूर्ण झाली. त्यामध्ये डॉ. उबाळे, प्रा. कठरे, प्रा. रोडे यांचा समावेश होता.

15 JUL 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालकपदी डॉ.एच.एन.कठरे

- डॉ. सोनाली रोडे मुंबई विभागाच्या सहसंचालक
- दोघेही राजाराम महाविद्यालयातील प्राध्यापक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालकपदी राजाराम महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे सहायक प्रा.डॉ.एच.एन. कठरे यांची निवड झाली आहे. राजाराम कॉलेजमधील इंग्रजी विषयाच्या प्रा. डॉ. सोनाली रोडे यांची उच्च शिक्षण, मुंबई विभाग येथे विभागीय सहसंचालकपदी नियुक्ती झाली आहे. याबाबतचे आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसचिव यांनी बुधवारी काढले आहेत. पहिल्यांदाच राजाराम महाविद्यालयातील दोघा प्राध्यापकांची सहसंचालकपदी निवड झाली आहे.

डॉ. कठरे मूळचे पाचवड (ता. खटाव, जि. सातारा) येथील आहेत. वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये त्यांनी पदवीपर्यंत व त्यानंतरचे शिक्षण शिवाजी विद्यापीठात घेतले. राजाराम कॉलेज येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून १५ वर्षांपासून कार्यरत होते. सध्या ते राजाराम महाविद्यालयात वाणिज्य विभागप्रमुख आहेत. यूजीसीचे तीन प्रकल्प त्यांनी यशस्वीपणे राबवले आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर ३० हून अधिक संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.

प्रा. डॉ. रोडे मूळच्या अमरावती येथील आहेत. संत गाडगेबाबा विद्यापीठ येथे पदव्युत्तर व पीएच.डी. पदवी संपादन केली. अमरावतीच्या शासकीय विदर्भ ज्ञान, विज्ञान संस्थेत १५ वर्षे व पाच वर्षे राजाराम महाविद्यालयात इंग्रजी विषयाच्या सहायक प्राध्यापिका म्हणून त्यांनी काम केले. वर्षभरापासून प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटरच्या संचालिका पदावर त्या कार्यरत होत्या. त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर ३५ संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. ७ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. व १३ विद्यार्थ्यांनी एम.फिल. पूर्ण केले आहे. त्यांना राष्ट्रीय स्तरावरील चार पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालकपदी नियुक्तीचा आनंद आहे. विभागातील प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करून चांगले काम करण्याचा प्रयत्न राहील. नियुक्तीचा आदेश प्राप्त झाल्यानंतर पदभार स्वीकारणार आहे.

- डॉ.एच.एन.कठरे,
नवनियुक्त कोल्हापूर विभाग उच्चशिक्षण सहसंचालक



मुंबईतील उच्चशिक्षण सहसंचालकपदाची जबाबदारी मिळाली आहे. मुख्यालयाच्या ठिकाणी काम करायला मिळणार आहे. तेथील प्राध्यापक व तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य राहील.

- डॉ. सोनाली रोडे,
नवनियुक्त मुंबई विभाग उच्चशिक्षण सहसंचालक

**डॉ. उबाळेंकडून तक्रारींचा निपटारा**

तत्कालीन सहसंचालक डॉ. अजय साळी यांच्या बदलीनंतर दीड वर्षापूर्वी डॉ. अशोक उबाळे यांची कोल्हापूर विभागीय सहसंचालक म्हणून निवड झाली. सहसंचालक कार्यालयातील गैरकारभाराबाबत आढावा बैठकीत तक्रारदारांनी पाढा वाचला. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून कार्यालय चर्चेत राहिले. डॉ. उबाळे यांनी बहुतांश तक्रारींचा निपटारा केला.

1 5 JUL 2021.

जनसंपर्क कक्ष

पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील एमबीए अभ्यासक्रम जागतिक दर्जाचा : प्रा. डॉ. नांदवडेकर

**गोकुळशिरगाव : प्रतिनिधी**

येथील शिवाजी विद्यापीठाचा एमबीएचा अभ्यासक्रम हा जागतिक दर्जाचा असून, या अभ्यासक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट टीचर्स असोसिएशन (सुम्टा) यांच्या वतीने आयोजित करिअर कनेक्ट या वेबिनारच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. वेबिनारचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन, सुम्टाचे सचिव प्रा. डॉ. विनोद बाबर हे प्रमुख उपस्थित होते.

पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले आणि पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षास बसलेल्या विद्यार्थ्यांना एमबीए अभ्यासक्रम आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती व्हावी, यासाठी या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. नांदवडेकर म्हणाले, सध्या स्पर्धेच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात चांगले विद्यार्थी घडविणारा अभ्यासक्रम हा शिवाजी विद्यापीठाने तयार केला आहे.

डॉ. एस. एस. महाजन म्हणाले, एमबीए आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी वेबिनार आयोजित करण्याची संकल्पना चांगली आहे. अभ्यास मंडळाचे चेअरमन प्रा. डॉ. सारंग भोला यांनी एमबीए अभ्यासक्रमाची संपूर्ण माहिती दिली. प्रा. डॉ. प्रवीण जाधव यांनी मार्गदर्शन केले. या वेबिनारला कोल्हापूर, सांगली, सातारा व इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक सुम्टाचे उपाध्यक्ष डॉ. बी. एस. सावंत यांनी केले.

15 JUL 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'उद्यान विद्या व रोपवाटिका व्यवस्थापन'साठी प्रवेश सुरू

**विक्रमनगर, ता. १४ :** अनेकांना बाग फुलविण्याचा छंद असतो; परंतु बागा चांगल्या रीतीने वाढविण्यासाठी बऱ्याचदा कुशल मनुष्यबळ मिळत नाही. हे लक्षात घेऊन गार्डन्स क्लबतर्फे चार वर्षांपासून शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रातर्फे उद्यान विद्या आणि रोपवाटिका व्यवस्थापन हा अभ्यासक्रम घेतला जातो. या अभ्यासक्रमात घरच्या बागा सांभाळण्याबरोबर या क्षेत्रात रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या व माळी काम करू इच्छिणाऱ्या तरुणांनाही मार्गदर्शक ठरत आहे.

गार्डन्स क्लबचे अनुभवी सभासद तसेच वनस्पतीशास्त्र व कृषी क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. दर आठवड्यातील दोन दिवस दुपारी एक ते चार या वेळेत लेक्चर्स घेतली जातात. या कोर्समध्ये प्रत्यक्ष झाडे लावणे, त्यांची अभिवृद्धी करणे, वेगवेगळ्या प्रकारचे ग्राफ्टिंग करणे, बागेसाठी लागणारी सेंद्रिय खते व कीटकनाशके घरच्या घरी तयार करणे व इतर प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. ही प्रात्यक्षिके वेगवेगळ्या ठिकाणच्या बागांमध्ये जाऊन दिली जातात. यासोबत बागेमधील सौंदर्य वाढविणाऱ्या तबकातील बाग, काच हंडीतील बाग, गिफ्ट देण्यासाठी फुलांचे आणि सक्यूलंटचे बुके असे विविध प्रकारही शिकविले जातात. सध्याच्या काळात इम्युनिटी वाढविण्यासाठी सकस आणि विषमुक्त भाजीपाल्याची गरज लक्षात घेऊन या कोर्समध्ये 'न्यूट्री किचन गार्डन'बाबत मार्गदर्शन केले जाते. हा कोर्स पूर्ण केल्यानंतर सेंद्रिय खते व सेंद्रिय कीटकनाशके तयार करणे, लँडस्केप करून बागा तयार करणे, सेंद्रिय भाजीपाला पिकविणे आणि रोपवाटिका तयार करून रोपांची विक्री करणे, अशा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. या कोर्ससाठी प्रवेश घेणाऱ्या इच्छुकांनी https://gardensclubkolhapur.org या वेबसाईटवर संपर्क साधावा, असे आवाहन गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा कल्पना सावंत यांनी केले.

# एमबीए अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा

## डॉ. नांदवडेकर; करिअर कनेक्ट वेबिनारचे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**



गांधीनगर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाचा एमबीएचा अभ्यासक्रम हा जागतिक दर्जाचा असून, याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. विद्यापीठाचा वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट टीचर्स असोसिएशन (सुम्टा) यांच्यातर्फे आयोजित करिअर कनेक्ट या वेबिनारच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. एस. महाजन प्रमुख पाहुणे होते. या वेळी 'सुटा'चे सचिव डॉ. विनोद बाबर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, "सध्याच्या स्पर्धेच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात चांगले विद्यार्थी घडविणारा अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केला आहे. भविष्यातील चांगले उद्योजक आणि व्यवस्थापक निर्माण होण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे." डॉ. महाजन म्हणाले, की एमबीए आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी वेबिनार आयोजित करण्याची संकल्पना चांगली आहे. अभ्यासक्रम आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी याची मदत होणार आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन प्रा. डॉ. सारंग भोला यांनी एमबीए अभ्यासक्रमाची संपूर्ण माहिती दिली. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील मार्गदर्शन डॉ. प्रवीण जाधव यांनी केले. 'सुटा'चे उपाध्यक्ष डॉ. बी. एस. सावंत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. श्वेता मेथा यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. दीपी बर्गे यांनी आभार मानले.

15 JUL 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकासाचा त्रिसूत्री फॉर्म्युला...

**स्किल डे विशेष...**

कोल्हापूर, ता. १४ : कोरोनामुळे 'वर्क फ्रॉम होम'चा ट्रेंड आहे. बेरोजगारांच्या संख्येत वाढ झाली आहे. विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात केल्याखेरीज पर्याय नाही. शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव विद्यार्थ्यांच्या अंगी विविधांगी कौशल्ये असावीत, यासाठी आग्रही आहेत. विभागातर्फे पाच वर्षांत २ लाख १३ हजार विद्यार्थ्यांना ११३ प्रकारांतील कौशल्यांचे प्रशिक्षण दिल्याचे ते सांगतात. डॉ. गुरव यांनी २०१२ ला १८ प्रमुख व ९५ उपक्षेत्रांचे सर्वेक्षण करत कोणत्या प्रकारचे कौशल्य हवे याचा अभ्यास केला. सध्या नोकरीत भक्कम स्थान ठेवण्यासाठी स्किल, अप स्किलिंग व रिस्किलिंग समजून घेणे आवश्यक असल्याचे ते सांगतात.

### स्किल

एखाद्या विद्यार्थ्याने अर्थशास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण मिळवणे, हा त्याने कसून केलेल्या अभ्यासाचा परिणाम; मात्र या विषयाचे ॲप्लिकेशन कसे करावे, हे त्याला समजणे म्हणजे त्याने त्यात कौशल्य प्राप्त करणे. ते कौशल्य त्याला आत्मसात करणे आवश्यक आहे.

### अप स्किलिंग

एमआयडीसीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लेथ मशिन कसे हाताळावे, याची माहिती असते. काळानुरूप त्या जागी सीएनसी, व्हीएमसी ही प्रोग्रॅम्ड मशिन्स आली. ती हाताळण्याचे प्रशिक्षण घेणे म्हणजे असलेल्या कौशल्यात वाढ करणे हे कर्मचाऱ्यांच्या हिताचे आहे. अन्यथा नोकरी गमावण्याचा धोका आहे. त्याकरिता त्यांना मराठीसह इंग्रजी व हिंदी भाषांचे ज्ञान असणे महत्त्वाचे.

### रिस्किलिंग

शाळा व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना वर्गात शिकवले जात होते. कोरोनामुळे ऑनलाईन शिकवले जात आहे. त्यामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. त्याला ऑनलाईन कसे शिकवावे, याचे प्रशिक्षण घ्यावे लागत आहे. हा रिस्किलिंगचा महत्त्वाचा भाग. यात एखादे काम तत्परतेने केले जाते.



**"पूर्वी बैल व रेड्याला औताला जुंपून शेतात पेरणी केली जायची. आता ट्रॅक्टरद्वारे केली जाते. दोन कोटी रुपयांची गुंतवणूक करून एखादे दुकान सुरू केले असले तरी कामगारांना ग्राहक हाताळण्याचे कौशल्य देणेही महत्त्वाचे.**

**- प्रा. डॉ. ए. एम. गुरव,**
समन्वयक, कौशल्य व उद्योजकता विभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2021


तरुण भारत

# उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर सहसंचालकपदी डॉ. हेमंत कठरे

प्रतिनिधी
कोल्हापूर

उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर विभागीय सहसंचालकपदी राजाराम महाविद्यालयातील डॉ. हेमंत कठरे यांची नियुक्ती करण्यात आली. मावळते सहसंचालक डॉ. अशोक उबाळे अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील भौतिकशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून रुजू झाले. बुधवारी दुपारी डॉ. उबाळे यांनी डॉ. कठरे यांच्याकडे सहसंचालक पदाची सूत्रे सुपुर्द केली.

विद्यमान सहसंचालक डॉ. कठरे राजाराम महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात गत १५ वर्षापासून सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी एम. ए., एम. फिल.चे शिक्षण शिवाजी विद्यापीठात पूर्ण केले. नागपूर विद्यापीठात पीएच. डी. पूर्ण केली. त्यांनी दिल्ली येथील युजीसीचे तीन प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चार विद्यार्थांनी पीएच. डी. पदवी पूर्ण केली आहे. तर सहा विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत. आतापर्यंत त्यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय

डॉ. हेमंत कठरे डॉ. उबाळे

पातळीवर ३० संशोधन पेपर प्रसिध्द झाले आहेत.

### डॉ. उबाळे यांनी ३५०० प्रलंबित कामाचा निपटारा केला

डॉ. अशोक उबाळे यांनी १६ डिसेंबर २०१९ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर विभागीय सहसंचालक पदाची सूत्रे हाती घेतली होती. तर रुजू झाल्यानंतर २०१०-११ पासून प्रलंबित असलेल्या जवळपास ३५०० प्रस्तावांचा निपटारा केल्याने त्यांच्या कामाचे कौतुक होत आहे.

### डॉ. सोनाली रोडे मुंबईच्या शिक्षण सहसंचालक

दरम्यान, राजाराम महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. सोनाली रोडे यांची मुंबई उच्च व तंत्र शिक्षण विभागीय सहसंचालकपदी निवड झाल्याचे सांगण्यात आले.